**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-१९/५/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.४ बुधवार दि.२३/५/२०१२ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**बुधवार दिनांक-२३/५/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| २० | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २ बुधवार दिनांक ११/४/२०१२ ची तहकुब करण्यांत आलेली व सभा क्रमांक-२ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| २१ | श्री. सय्यद इकबाल अब्दुल गफुर अर्जदार श्री. लिंबा सिदु रासकर व इतर यांच्या नावावर जुने घरे होती. जुन्या बांधकामाची नोंद रद्द करून ओपन प्लॉटची आकारणी करणेबाबत त्यांना देण्यांत आलेले सन २००९-२०१० पासून (वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक २९० ते २९७,३०१ते ३०६ व ३२२ अखेर एकुण १५ बीले) घरपट्टी रूपये ३०,५७०/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २२ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदावर अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची केलेल्या कंत्राटी करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी व सदर मानधन वाढी बाबत निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट. |
| २३ | अहमदनगर महानगरपालिका श्री. नारायण बाबुराव मिसाळ, यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत. ऑफिस रिपोर्ट. |
| २४ | अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना अहमदनगर क्र.४, अंतिम भूखंड क्र.१२८ व १२९ ची दंडासहित अकृषिक आकारणी (बिनशेती ) सारा आकारणी रक्कम रू.४१,२८,९१२/- अदा करणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव. |

...२

| | |
|---|---|
| २५ | सायराबानो अब्दुल खान पठाण, रा. वाबळे कॉलनी ,अ.नगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन १९९८-२००९ अखेर (वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ४५०) पाणीपट्टी रूपये १२,९८६/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २६ | अहमदनगर महानगरपालिका नगररचना योजना क्रमांक-३ अंतीम भूखंड क्र.९२ बुरूडगांव रोड या महानगरपालिकेच्या जागेत खाजगी विकासकामार्फत भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसित करणेबाबत मागविणेत आलेल्या ई- निविदा क्र.२२५ बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २७ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २८ | अहमदनगर महानगरपालिकेचे मा. न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात कामकाजाकरीता मागील कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांचा फेरविचार करणे व काही नव्याने नेमणुक करावयाचे बाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र. २० - मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २ बुधवार दिनांक ११/४/२०१२ ची तहकुब करण्यांत आलेली व सभा क्रमांक-२ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२ रोजीच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- २१ ते २८ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२० बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२० बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-२बुधवार दिनांक११/४/२०१२ची तहकुब करण्यांत आलेली व सभा क्रमांक-२ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २ बुधवार दिनांक ११/४/२०१२ ची तहकुब करण्यांत आलेली व सभा क्रमांक-२ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्रमांक-२ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.गंधे सु.मो.:-मागील सभा दिनांक १३/०४/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. सातपुते दि.ना.:- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २ बुधवार दिनांक ११/४/२०१२ ची तहकुब करण्यांत आलेली व सभा क्रमांक-२ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२ रोजीच्या रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठरावः-</u>** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २ बुधवार दिनांक ११/४/२०१२ ची तहकुब करण्यांत आलेली व सभा क्रमांक-२ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२१ बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२१ बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. सय्यद इकबाल अब्दुल गफुर अर्जदार श्री. लिंबा सिदु रासकर व इतर यांच्या नावावर जुने घरे होती.जुन्या बांधकामाची नोंद रद्द करून ओपन प्लॉटची आकारणी करणेबाबत त्यांना देण्यांत आलेले सन २००९-२०१०पासून (वॉर्ड क्र.८५ बील क्र.२९०ते २९७,३०१ते ३०६ व ३२२ अखेर एकुण १५बीले)घरपट्टी रू.३०,५७०/-चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.३ दि.२३/३/२०११

विषय- जुन्या बांधकामाची नोंद रद्द करून ओपन प्लॉटची आकारणी करणेबाबत.

संदर्भ :- श्री. सय्यद इकबाल अब्दुल गफुर यांचा दि.२६/११/२००९ रोजीचा अर्ज.

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, श्री. सय्यद इकबाल अब्दुल गफुर यांनी दि.१९/११/२००९ रोजी अर्ज सादर केलेला असुन सदर अर्जात "वॉर्ड क्र.८५ बील नं.२९० ते २९७ व ३०१ ते ३०६ व ३२२ एकूण १४ बिले श्री. लिंबा सिदु रासकर व इतर यांच्या नावावर जुने घरे होती. सदरची संपुर्ण जागा खरेदी केलेली असुन सदर जागेवरील जुने घरे (बांधकाम) पुर्णपणे पाडुन टाकण्यात आलेले आहे. तरी मला जुन्या बांधकामाची आकारणी कमी करून ओपन प्लॉटची आकारणी करण्यांत यावी व त्या मिळकतीवर माझे नाव लावण्यात यावे." अशी विनंती केलेली आहे.

याबाबत वास्ताविक परिस्थिती अशी की, वॉर्ड क्र.८५ बिल क्र. २९० ते २९७ , ३०१ ते ३०६ व ३२२ या बिलावर श्री. लिंबा सिदु रासकर व इतर यांचे नाव आहे. श्री. रासकर व इतर यांनी खालील पावतीनुसार सन २००८-०९ अखेर संपुर्ण घरपट्टी व पाणीपट्टी भरलेली आहे.

| अ.नं. | बि.क्र. | नांव | पावती क्र. | दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २९० | श्री. डी.एल.रासकर | १०७३५१ | १०/६/०९ | ५७२ | घरपट्टी |
| २ | २९१ | श्री. रोहिदास लिंबाजी रासकर | ७१४८६ | १७/३/०९ | ५७२ | घरपट्टी |
| ३ | २९२ | श्री. गुलाब लिंबाजी रासकर | १०७३५२ | १०/६/०९ | ५७२ | घरपट्टी |
| ४ | २९३ | श्री.रमेश लिंबाजी रासकर | १०७३५३ | १०/६/०९ | ५७२ | घरपट्टी |
| ५ | २९४ | श्री. शिवाजी लिंबाजी रासकर | १०७३५४ | १०/६/०९ | ५७२ | घरपट्टी |
| ६ | २९५ | श्री. सुरेश लिंबाजी रासकर | ७१४०५ | १२/१/०९ | ५७२ | घरपट्टी |
| ७ | २९६ | पार्वती बाळासाहेब धाडगे | १०७३५५ | १०/६/०९ | ५७२ | घरपट्टी |
| ८ | २९७ | श्री. लिंबाजी सिध्दु रासकर | १०७२३३ | १०/६/०९ | १५०० | पाणी पट्टी |
| ९ | ३०१ | लिंबाजी रासकर | १०७३५७ | १०/६/०९ | २८४ | घरपट्टी |
| १० | ३०२ | लिंबाजी रासकर | १०७३५८ | १०/६/०९ | ८५२ | घरपट्टी |
| ११ | ३०३ | लिंबाजी रासकर | १०७३५९ | १०/६/०९ | २८४ | घरपट्टी |
| १२ | ३०४ | लिंबाजी रासकर | १०७३६० | १०/६/०९ | २८४ | घरपट्टी |
| १३ | ३०५ | लिंबाजी रासकर | १०७३६१ | १०/६/०९ | २८४ | घरपट्टी |
| १४ | ३०६ | लिंबाजी रासकर | १०७३६२ | १०/६/०९ | ३२२ | घरपट्टी |
| १५ | ३२२ | श्री. लिंबाजी सिध्दु रासकर | १०७३६३ | १०/६/०९ | २४५ | घरपट्टी |

सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात बिल क्र.२९० ते २९६ , ३०१ ते ३०६ व ३२२ वरील मिळकतीवर असलेले बांधकाम मॉर्डन कन्स्ट्रक्शन यांनी पाडुन टाकले व त्या मिळकतीचे एकुण ११ ओपन प्लॉट पाडलेले आहे.

मालमत्ता कर आकारणी विभाग यांनी सन २००९-१०मध्ये एकुण ११ ओपन प्लॉटपैकी ६ ओपन प्लॉटवर कर आकारणी केलेली आहे व सन २०१०-११ मध्ये उर्वरीत ५ ओपन प्लॉटवर कर आकारणी केलेली आहे.सन २००९-१०व २०१०-११ मध्ये ओपन प्लॉटवर आकारणी केल्यामुळे संगणकावर बिल क्र.१०३८ ते १०४९ वर नोंद करण्यात आलेली आहे.

सन २००९-१० या आर्थिक वर्षापासून बिल क्र.२९० ते २९६ , ३०१ ते ३०६ , ३२२ व बिल क्र.१०३८ ते १०४९ अशा एकाच मिळकतीवर दोन्ही ठिकाणी कर आकारणी चालु असल्याने बिल क्र.२९० ते २९६ , ३०१ ते ३०६, ३२२ या बिलावरील कर आकारणी कमी करणे उचित वाटते व सन २०११-१२ पासुन नविन झालेल्या बांधकामाची कर आकारणी करणेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस प्र.स.क्र.-३ यांचा अहवाल असे.

कर निरीक्षक :- सादर, सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात मॉर्डन कंन्स्ट्रक्शन यांनी बील क्र.२९० ते २९६ , ३०१ ते ३०६ व ३२२ वरील बांधकाम पाडुन टाकण्यात आलेले असल्याने व मालमत्ता कर आकारणी विभाग यांनी बिल क्रमांक १०३८ ते १०४९ या बिलावर ओपन प्लॉट प्रमाणे कर आकारणी केल्यामुळे बिल क्र.२९० ते २९६ , ३०१ ते ३०६ व ३२२ वरील कर आकारणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कराधन नियम ८ मधील कलम २०(१) (क) अन्वये कर आकारणी कमी करणेस व कलम १५२ नुसार सन २००९-१०पासून रक्कम निर्लेखित करणेस आदेशार्थ सादर. /**अ**

प्रभाग अधिकारी :- सादर, वसुली लिपिक व कर निरीक्षक यांचे रिपोर्टास व मतास सहमत पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव

मा.स.क.मु.अ. :- सादर, सदर प्रकरणी लिंबा सिदू रासकर यांची मिळकत मॉर्डन कांन्ट्रक्शन यांनी खरेदी करून सदर जागेवर असलेले बांधकाम पाडुन त्या जागेवर १ ओपन प्लॉटचा ले-आउट नगर रचना खात्याकडुन मंजुर करून ११ ओपन प्लॉट वर कर आकारणी विभागाकडुन बील नं. १०३८ ते बील क्र.१०४३ व १०४५ ते १०४९ अशी ११ओपन प्लॉटवर नविन क्षेत्राप्रमाणे कर आकारणी करण्यात येवुन सन २०११ पर्यत सदर ओपन प्लॉटची आकारणी रक्कम वसुल केलेली आहे. परंतु श्री.लिंबा सिदू रासकर यांचे पुर्वीचे बील नं.२९० ते २९७ व ३०१ ते ३०६ आणि ३२२ अशी १५ बिले रद्द होणे आवश्यक होते. तरी सदरची बीले रद्द करून येवुन

तरी श्री. रासकर व इतर यांचे नावे असेली वरील बिलाची रक्कम रू.२७,६९१/- व शास्ती इतकी निर्लेखित होणे अपेक्षीत आहे. तरी प्रभाग अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव "अ" नुसार दुरूस्तीस हरकत नाही तथापि आदेशार्थ सादर./**अ**

मुख्य लेखापरिक्षक :- प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.३, तसेच सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी हयांचे अभिप्रायानुसार पुढील निर्णयास्तव सादर.

मा.उपायुक्त (कर) :- "अ" नुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठवणेस्तव आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२७/३/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- श्री. सय्यद इकबाल अब्दुल गफुर अर्जदार श्री. लिंबा सिदु रासकर व इतर यांच्या नावावर जुने घरे होती.जुन्या बांधकामाची नोंद रद्द करून ओपन प्लॉटची आकारणी करणेबाबत बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**ठराव :-**अर्जदार श्री. सय्यद इकबाल अब्दुल गफुर यांनी श्री. लिंबा सिदु रासकर व इतर यांच्या नावावर पुर्वी असलेल्या जुने बांधकाम पुर्णपणे पाडून टाकल्याने त्याठिकाणी त्यांना ओपन प्लॉटची आकारणी केलेली आहे. तथापी जुने बांधकामाची घरपट्टी संबंधीत विभागाने रद्द न करता तशीच सुरू ठेवल्याचे कारणाने त्यांना देण्यांत आलेली जुन्या घराची घरपट्टी सन२००९-२०१० पासून (वॉर्ड क्र.८५ बील क्र.२९०ते २९७,३०१ते ३०६ व ३२२ अखेर एकुण १५बीले)घरपट्टी रू.३०,५७०/-(रूपये तीस हजार पाचशे सत्तर फक्त)चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२२ बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२२ बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदावर अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची केलेल्या कंत्राटी करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी व सदर मानधन वाढी बाबत निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र. १३५ दि.२७/४/२०१२

प्रस्तावना-विषय-रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदावर अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी व सदर मानधन वाढीबाबत निर्णयास्तव करीता

सादर,

प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील दिनांक २८/३/२०१२ चे प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे.दवा. येथे कंत्राटी करारानुसार दिनांक ३/५/२०१२ ते २/११/२०१२ अखेर सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी या पदी दरमहा मानधनावर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली होती. तथापि डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांनी दिनांक २३/४/२०१२ रोजी विनंती अर्ज देवुन रक्तपेढी विभागात रक्त संक्रमण अधिकारी या पदावर काम करणेस तयार आहे. रक्त संक्रमण अधिकारी पदाच्या जाहिराती नुसार दिलेले मानधन दरमहा रूपये २०,०००/- कमी आहे. कामाचा अनुभव लक्षात घेता दरमहा रूपये ३०,०००/- मानधन देणेस व सदर पदावर सहा महिने काम करणेसाठी नेमणूक द्यावी. असे नमुद केलेले आहे.त्यानुषंगाने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.प्र. आरोग्याधिकारी यांनी दिनांक २४/४/२०१२ रोजी रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदाकरीता दिनांक २/४/२०१२ रोजीच्या प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे भरती प्रक्रिया राबविण्यांत आली. परंतु डॉक्टर न मिळाल्याने पद भरले नाही. डॉ. कुलकर्णी यांचा अर्ज व अनुभवाचा विचार व मा.आयुक्त व मा. महापौर यांचेशी झालेल्या चर्चेनुसार आणि रक्तपेढी पुनश्चः सुरू करणेसाठी रक्तपेढी रक्त संक्रमण अधिकारी यांची अत्यावश्यक लक्षात घेता संबंधीत डॉक्टरांना रक्त संक्रमण अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणे उचित वाटते. असे नमुद करून अभिप्राय दिलेला आहे.

यापुर्वी रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी कंत्राटी कराराप्रमाणे मानधनावर करारबध्द भरती करीता वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देण्यांत आलेली होती. परंतु उमेदवाराच उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेचा तातडीने विचार होवुन त्यानुसार जा.क्र. आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणूक १९४ दिनांक २५/४/२०१२ अन्वये डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६ दि.२३/४/२०१२ अन्वये कै.बा.दे.दवा. येथे वैद्यकीय अधिकारी या पदी केलेली सहा महिन्याची नियुक्ती रद्द करून रक्तपेढी विभागाकरीता तात्पुरत्या

स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी दरमहा मानधन रू.२०,०००/- या वर अटी व शर्ती नुसार करारबध्द करण्यांत येवुन नियुक्ती आदेश निर्गमित केलेले आहे. व सदरच्या आदेशामध्ये अट क्रमांक-९ प्रमाणे विनंती अर्जानुसार मानधनवाढी संदर्भात मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यांत येईल. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी अटी व शर्ती नुसार कंत्राटी कराराप्रमाणे डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची जा.क्र. आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणूक १९४ दिनांक २५/४/२०१२अन्वये दिनांक ३/५/२०१२ पासून सहा महिन्या करीता दरमहा मानधन रू.२०,०००/- यावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस व केलेल्या प्रस्तावावरील कार्यवाहीस तसेच डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांच्या उपरोक्त विनंती अर्जानुसार दरमहा मानधन वाढी बाबत निर्णयास्तव करीता सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहा. आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदावर दरमहा मानधनावर कंत्राटी करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी व सदर मानधन वाढीबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदाकरीता मानधन वाढीबाबतचा सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायवाकड नि.व.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- वैद्यकीय अधिका-यांचा मानधन वाढीबाबतचा एकत्रित प्रस्ताव लवकर सादर करणेत यावा. ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**ठरावः-**रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदावर अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची दिनांक ३/५/२०१२ पासून सहा महिन्या करीता दरमहा मानधन रू.२०,०००/- (रूपये वीस हजार फक्त) करारबध्द केलेल्या कंत्राटी करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट, खर्च मंजूर.

तसेच वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदाकरीता मानधन वाढीबाबतचा सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करणे यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायवाकड निलीमा वसंत. सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२३ बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२३ बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका श्री. नारायण बाबुराव मिसाळ, यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत. ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र. १४४ दि.४/५/२०१२

प्रस्तावना-विषय- श्री. नारायण बाबुराव मिसाळ, यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांनी दि.७/४/२०१२ रोजी अर्ज देवुन "मी आपल्या स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेपासुन (२००७) या केंद्रात प्रकल्प संचालकपदी कार्यरत आहे. आज अखेर २८५ विद्यार्थी या केंद्रातून युपीएससी व एमपीएससी परिक्षा उत्तीर्ण झाले आहेत. माझ्या सहा महिन्याचे अंतिम नियुक्तीपत्र जा.क्र. आस्था./कंत्राटी नेमणूक ३५०६ दि.६/३/१२ ची मुदत दि.४/३/१२ रोजी संपली आहे. असे असले तरी मी या पदी विनाखंड कार्यरत आहे. मागील आठवडयात आपल्या केंद्रातील ५ विद्यार्थी पीएसआय पदावर निवड झाली ही विशेष उल्लेखनीय बाब आहे तरी या विनंती अर्जानुसार आपण मला पुर्वलक्षी पध्दतीने या प्रकल्प संचालक पदावर पुनश्च सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दयावी." असे नमुद करून विनंती केलेली आहे.

त्यानुसार प्रभारी प्रसिध्दी अधिकारी यांनी " प्रा.श्री. मिसाळ हे केंद्र प्रकल्प संचालक म्हणून २००७ पासून कार्यरत आहे. या केंद्रात २८५ विद्यार्थी युपीएससी व एमपीएससी च्या परिक्षा उत्तीर्ण झालेले आहे. तरी त्यांचे दि.७/४/१२ रोजीच्या विनंती अर्जाप्रमाणे त्यांना प्रकल्प संचालक पदावर नियुक्ती देणेबाबत शिफारस करून सुचित केलेले आहे.

तरी प्रा.श्री.नारायण बाबुराव मिसाळ यांच्या दि.७/४/१२ रोजीच्या विनंती अर्जानुसार व प्रसिध्दी अधिकारी यांचे शिफारशीनुसार अहमदनगर महानगरपालिके मार्फत स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राच्या प्रकल्प संचालक पदावर प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची जा.क्र.आस्था. / कंत्राटी नेमणूक ४३१ दि.३/५/१२ अन्वये दि.७/३/१२ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.१५०००/- या एकत्रित मुशाहि-यावर अटी व शर्ती नुसार केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहा. आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-श्री.नारायण बाबुराव मिसाळ, यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**ठरावः-** अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र प्रकल्प संचालक या पदावर श्री. नारायण बाबुराव मिसाळ, यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दिनांक ७/३/२०१२ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये १५,०००/-(रूपये पंधरा हजार फक्त) मानधनावर या एकत्रित मुशाहि-यावर अटी व शर्ती नुसार केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२४ बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२४ बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना अहमदनगर क्र.४,अंतिम भूखंड क्र.१२८ व १२९ ची दंडासहित अकृषिक आकारणी (बिनशेती ) सारा आकारणी रक्कम रू.४१,२८,९१२/- अदा करणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. नगररचना विभाग दिनांक १७/३/२०१२

विषय :- अहमदनगर नगररचना क्र.४,अंतिम भूखंड क्र.१२८ व १२९ ची दंडासहित अकृषिक (बिनशेती) सारा आकारणी रक्कम रू.४१,२८,९१२/- अदा करणेबाबत.

संदर्भ :- कामगार तलाठी,सावेडी यांचेकडील नोटीस क्र.०४/२०१२ दि.७/३/२०१२

सादर,

अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या नगररचना योजना अहमदनगर क्र.४, अंतिम भूखंड क्र.१२८ व १२९ या एकत्रित जागेचा सन २०११-२०१२ या वर्षाचा अकृषिक सारा रक्कम रू.५७३४६/- तसेच सन १९८५ ते २०११ अखेर एकूण २६ वर्षाची थकबाकी रक्कम रू.१४,९०,९९६/- त्यावरील स्थानिक उपकर रक्कम रू. २,८६,७३०/- व वार्षिक आकारणीच्या ४० पट अनधिकृत बिनशेती वापराचा दंड रक्कम रू.२२,९३,८४०/- अशी एकूण रक्कम रू.४१,२८,९१२/- मुदतीत म्हणजेच ३१ मार्च २०१२ अखेर पर्यत भरणे बाबत संदर्भित नोटीशीद्वारे इकडेस कळविण्यांत आलेले आहे.

उपरोक्त नगररचना योजना अहमदनगर क्र.४,मधील अंतिम भूखंड क्र.१२८हा भूखंड महानगर पालिकेचया मालकीच्या असून त्यामध्ये महानगरपालिका कर्मचा-यांसाठी घरकुल योजना राबविण्यांत आलेली असून लाभार्थी कर्मचा-यांना सन १९८९ मध्ये तेथील घरांचा ताबा देण्यात आलेला आहे. त्यापैकी ज्या कर्मचा-यांची हप्त्याद्वारे घराची संपूर्ण रक्कम महानगरपालिकेकडे जमा झालेली आहे. त्यांना सदर घराचे खरेदीखत करून देण्यांत आलेले असून या जागेवर सिटीसर्व्हे रेकॉर्डला त्यांचे नाव दाखल झालेले आहे. मात्र घरकुल योजना राबविण्यापूर्वी सदर जागची बिनशेती (अकृषिक) परवानगी घेण्यात आलेली नसल्यामुळे तेथे अनाधिकृत बिनशेती वापराचा दंड आकारण्यात आलेला आहे.

तसेच नगररचना योजना अहमदनगर क्र.४, मधील अंतिम भूखंड क्र.१२९ हा भूखंड सुध्दा महानगरपालिकेच्या मालकीचा असून एकूण क्षेत्रफळ ३२२८४.२० चौ.मी. एवढे आहे. त्यापैकी १०२२० चौ.मी. एवढी जागा आकाशवाणी केंद्रास वार्षिक भाडेपट्टयाने देण्यात आलेली आहे. तसेच ४४५० चौ.मी. एवढया जागेवर महानगरपालिकेचे अस्तित्वातील शॉपींग सेंटर व भाजी मार्केटचे बांधकाम करण्यात आलेले आहे. मात्र हे बांधकाम सुध्दा बिनशेती परवानगी न घेताच करण्यात आलेले आहे. सदर व्यापारी संकुलामधील काही गाळयात महानगरपालिकेचे विभागीय कार्यालय असून इतर गाळे भाडेतत्वाने देण्यात आलेले आहेत. व आता अं.भू.क्र. १२९ पै उर्वरित शिल्लक जागेवर ५५० प्रेक्षक क्षमतेचे बंदिस्त नाटयगृह बांधणेबाबतचा प्रस्ताव आहे. त्यामुळे याही जागेवर २६ वर्षाची अकृषिक आकारणीची थकबाकी व ४० पट अनधिकृत बिनशेती वापराचा दंड आकारण्यात आलेला आहे.

सदर नरयो क्र.४अंभूक्र १२८व १२९ची संदर्भित नोटीशीद्वारे आकारलेल्या अकृषिक आकारणीचा तपशिल खालीलप्रमाणे---

| | | |
|---|---|---|
| अंभूक्र- १२८ व १२९ ची वार्षिक अकृषिक आकारणी ( सन २०११-२०१२) | = | ५७,३४६/- |
| अंभूक्र- १२८ व १२९ ची २६ वर्षाची अकृषिक आकारणी थकबाकी (सन १९८५ ते २०११) | = | १४,९०,९९६/- |
| स्थानिक उपकर | = | २,८६,७३०/- |
| वार्षिक अकृषिक सा-याच्या ४० पट दंड (५७३४६x४०) | = | २२,९३,८४०/- |
| **एकुण** | | **४१,२८,९१२/-** |

वरील रक्कम मुदतीत न भरल्यास महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १७६ नुसार जंगम मालमत्ता जप्त करणे कलम १८० नुसार जंगम मालमत्ता अटकावून ठेवणे किंवा विक्री करणे तसेच कलम १८३ व १८४ नुसार वरिष्ठांच्या आदेशाने सक्तिच्या मार्गाने वसूल करणे अशा प्रकारची कारवाई होवू शकते. त्यामुळे सदरची रक्कम भरणे आवश्यक आहे.

तरी अहमदनगर नगररचना योजना अहमदनगर क्र.४, अं.भू.क्र. १२८ व १२९ ची एकत्रित सन १९८५ ते २०१२अखेर पर्यंतची अकृषिक आकारणी (बिनशेती सारा) व त्याचा अनधिकृत बिनशेती वापराचा दंड अशी एकुण रक्कम रूपये ४१,२८,९१२/- (रूपये एक्केचाळीस लाख अठ्ठावीस हजार नउशे बारा फक्त) अदा करण्यास सदरचा विषय मा.स्थायी समिती कडे निर्णयास्तव सादर करणे उचित होईल. आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

--**--

मा.उपायुक्त (सा.):- रजेवर

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२२/३/२०१२

--**--

नगररचना विभाग दि.३/५/२०१२

सादर,

विषय :- अहमदनगर नगररचना क्र.४,अंतिम भूखंड क्र.१२८ व १२९ ची दंडासहित अकृषिक (बिनशेती) सारा आकारणी रक्कम रू.४१,२८,९१२/- अदा करणेबाबत.

संदर्भ :- १]कामगार तलाठी,सावेडी यांचेकडील नोटीस क्र.०४/२०१२ दि.७/३/२०१२
२] नगरसचिव विभाग जा.क्र.१९ दि.१९/४/२०१२

उपरोक्त संदर्भ क्र.- १ अन्वये मागणी केल्याप्रमाणे अहमदनगर नगररचना योजना क्र.४ अंतिम भूखंड क्र.१२८ व १२९ ची दंडासहित अकृषिक (बिनशेती) सारा आकारणी रक्कम रू.४१,२८,९१२/- अदा करणेस मंजूरी मिळणेसाठी सदरचा विषय मा. स्थायी समिती कडे पाठविण्याबाबतच्या कार्यालयीन

टिपणीवर  मा.आयुक्त यांची सही झाल्यानंतर सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात आलेला होता. तथापि सदर प्रस्तावावर मा.आयुक्त यांचा "सदरचा विषय मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यांत यावा"- असा स्पष्ट शेरा नसल्यामुळे संदर्भ क्र.२ अन्वये सदर प्रस्ताव परत या विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.

तरी सोबत जोडलेल्या पूर्वीच्याच कार्यालयीन टिपणीवर वर नमूद केल्याप्रमाणे मा.आयुक्त साहेब यांचा शेरा नमूद करणेसाठी प्रस्ताव फेरसादर करण्यात येत आहे. आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

मा.आयुक्त साहेब : न.र. यांचे अहवालानुसार मा.स्थायी समिती पुढे निर्णयार्थ सादर. दि.४/५/२०१२

जा.क्र./टी.पी./४८७ दि.५/५/२०१२

नगररचनाकार :-  नगरसचिव  पु.त.साठी रवाना   दि.५/५/२०१२

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये ंवाचून  दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-नगररचना योजना अहमदनगर क्र.४,अंतिम भूखंड क्र.१२८व १२९ची दंडासहित अकृषिक आकारणी  (बिनशेती ) सारा आकारणी अदा  करणे बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :-  ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- सदर विषयाबाबत परिपुर्ण माहिती देण्यांत यावी.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- अहमदनगर नगररचना क्रमांक ४ अंतिम भुखंड क्रमांक १२८,१२९ ची जागा स्कीम मध्ये महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. त्याठिकाणी बांधकाम करावयाचे आहे. सदरची जागा रिझर्व्हेशनची आहे. व सदर जागेवर सन २०११-२०१२ या वर्षाचा अकृषिक सारा रक्कम रु.५७,३४६/- तसेच मागील सन १९८५ ते सन २०११ अखेर १४,९०,९९६/- त्यावरील स्थानिक उपकर २,८६,७३०/- व वार्षिक आकारणीच्या ४० पट अनधिकृत बिनशेती वापराचा दंड २२,९३,८४०/- अशी एकुण रक्कम रु. ४१,२८,९१२/- दिनांक ३१/०३/२०१२ अखेर भरणे बाबत कामगार तलाठी सावेडी कार्यालय यांची नोटीस क्रमांक ४/२०१२ दिनांक ०७/०३/२०१२ अन्वये इकडेस कळविलेले आहे. सदर कराबाबतचा वाद असल्यामुळे आजपर्यंत रक्कम भरलेली नाही. सदर नोटीशीबाबत पत्रव्यवहार करुन शासनाचे मार्गदर्शन घेवून नंतर कर भरावा. असे वाटते.

नगररचनाकार श्री.धोंगडे :- सन १९८५ पासुन सदर जागेवर थकबाकी महानगरपालिकेकडे दाखविलेली आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. व मा.श्री. डागवाले कि.आ. :- सदरच्या प्रस्तावात सुचविण्यांत आलेला अकृषिक कर भरणे बाबत मा.आयुक्त साो यांना अधिकार देण्यांत यावेत. त्यांनी मा.शासनाशी पत्रव्यवहार करुन कमीत कमी कर कसा भरावा लागेल याबाबत कार्यवाही करावी.

मा.सौ.गायवाकड नि.व.:- याबाबतचे अधिकार मा.आयुक्त साहेब यांना दिलेल्या मा. शासनाशी वेळोवेळी पत्रव्यवहार करणे योग्य राहील.

मा.श्री. सातपुते दि.ना.:- याबाबतचे अधिकार मा.आयुक्त साहेब यांना दयावेत.

मा.सभापती साहेब :- सध्याची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता दंड व करा संदर्भात मा.शासनाशी पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यामुळे दंडाची रक्कम माफ होउ शकते. तरी त्याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी दयावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना अहमदनगर क्र.४,अंतिम भूखंड क्र.१२८ व १२९ ची दंडासहित अकृषिक आकारणी (बिनशेती )सारा आकारणी रक्कम रू.४१,२८,९१२/- (रूपये एक्केचाळीस लाख अठ्ठावीस हजार नउत्रशे बारा फक्त) अदा करणेबाबत मा.आयुक्त यांनी मा. शासनाशी याबाबत पत्रव्यवहार करावा.अकृषिक (बिनशेती ) सारा तसेच दंडाची रक्कम नाममात्र भरणेची तयारी दर्शवुन त्यास अनुमती देण्याबाबत विनंती करावी. याबाबत मा. शासनाकडून प्राप्त होणा-या पत्रानुसार व होणा-या निर्देशानुसार मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी उचित कार्यवाही करावी. तसेच महानगरपालिकेस या प्रकरणी अदा करावी लागणारी रकमेच्या अदायगी बाबत कार्यवाही करण्याचे अधिकार मा.आयुक्त , अहमदनगर महानगरपालिका यांना देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२५ बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२५ बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** सायराबानो अब्दुल खान पठाण, रा. वाबळे कॉलनी ,अ.नगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन १९९८-२००९ अखेर (वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ४५०) पाणीपट्टी रूपये १२,९८६/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र.३ दिनांक १५/३/२०११

विषय :- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- सायराबानो अब्दुल खान पठाण यांचा दि.३/३/११ रोजीचा अर्ज.

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, सायराबानो अब्दुल खान पठाण रा. वाबळे कॉलनी, अ.नगर यांचा अर्ज दि.३/३/२०११ रोजी इकडेस प्राप्त झाला असुन त्यांनी आपल्या अर्जात नळ कनेक्शन नसतांना सुध्दा अनाधिकृत नळ कनेक्शन ची लागलेली पाणीपट्टी व माझ्या जागेची समक्ष पाहणी करून नळ कनेक्शन आहे किंवा नाही याची खात्री करून नळ पट्टी रद्द करण्याबाबतची विनंती केली आहे.

अर्जदार यांचे सदर अर्जावरून जागेची समक्ष पाहणी करून सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल पाणीपुरवठा विभागाचे फिटर श्री.ससाणे यांना अहवाल सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी दि.१०/३/११ रोजी पाहणी करून सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन येत नाही तसेच अस्तित्वात नाही असा अहवाल दि.१०/३/१० रोजी सादर केला आहे.

सदर ठिकाणी समक्ष पहाणी केली तसेच सदरच्या दोन्ही मिळकतीचे रिव्हीजन अभिलेख तपासले (छानणी) केली असता बिल नं. ४४९ वर नळ जोड आढळुन येतो व बिल नं.४५० वर नळ जोडची नोंद नाही. परंतु वसुली अभिलेखाची संगणकावर नोंद घेत असतांना अनावधाने अथवा नजर चुकीने नोंदी झालेचे आढळते. सबब बिल नं.४५० वरील भरलेली संपूर्ण रक्कम जनरल पाणीपट्टी वगळता अर्जदार यांचे मागणी नुसार देणे उचित वाटते व टाचण, डिमांड रजिस्ष्टर येथे सर्व नोंदी अद्यावत करून घेणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अनुसार आदेश होणेबाबत रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली मदतनीस वॉर्ड क्र.८५ यांचा अहवाल असे.

कर निरीक्षक :- सादर, सदर ठिकाणी वसुली मदतनीस यांचे रिपोर्ट नुसार मान्यस्तव सादर.

प्रभागअधिकारी प्र.क्र.-३:- सादर रिपोर्ट व करनिरीक्षक यांचे शे-याचे अवलोकन केले सन०३-०४ चे रिव्हीजन मध्ये "अ" फार्म तपासणी केली तसेच जागेवर प्रत्यक्ष पहाणी केली असता नळ जोड आढळुन आले नाही.परंतु सन ०३/०४मध्ये झालेल्या सर्व्हेक्षणाचे वेळी नोंदी चुकीचे टाकले मुळे पाणीपट्टी येत आहे.सन ०८मध्ये मनपा निवडणूक असलेमुळे अर्जदार यांचे कडून दोन्ही मिळकतीचे संपूर्ण कर भरूण घेतल्याचे आढळते (अंडर प्रोस्टेट)सबब रिपोर्टनुसार सदर मिळकतीवर असलेली (भरून घेतलेली) पाणीपट्टीचे पैसे परत दयावेत किंवा कसे या बाबत आदेशार्थ

सोबत- प्रतिज्ञापत्र

मा.स.क.मु.अ. :- प्रभाग अधिकारी प्रभाग क्र.३ सदरचे प्रकरण मा.आयुक्त साहेब यांनी नेमलेल्या पाहणी कमिटी पुढे सादर करण्यात यावे.

मा.मुख्य लेखापरिक्षक :- सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी हयांचे अभिप्रायानुसार पुढील आदेशार्थ.

मा.उपायुक्त (कर) :- पाहणी समिती अहवालासह नळपट्टी निर्लेखित करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणे मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१२/३/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सायराबानो अब्दुल खान पठाण यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**<u>ठरावः-</u>** सायराबानो अब्दुल खान पठाण, रा. घर नं.६/२ वाबळे कॉलनी , मुंकुंदनगर अ.नगर यांनी केलेल्या अर्जानुसार व दिलेल्या प्रतिज्ञापत्रान्वये तसेच पहाणी समितीच्या समक्ष पहाणी अहवालानुसार संबंधीतांना नळ कनेक्शन नसतांनाही दिनांक ५/११/२००८रोजी त्यांनी भरलेली पाणीपट्टी या सर्व बाबी विचारात घेता सन १९९८-२००९अखेर (वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ४५०) पाणीपट्टी रूपये १२,९८६/- (रूपये बारा हजार नउशे शहाऐंशी फक्त)चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२६ बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२६ बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना योजना क्रमांक-३ अंतीम भूखंड क्र.९२ बुरूडगांव रोड या महानगरपालिकेच्या जागेत खाजगी विकासकामार्फत भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसित करणेबाबत मागविणेत आलेल्या ई- निविदा क्र.२२५ बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. नगररचना विभाग C-००२६८ दि.११/५/२०१२

विषय- नगररचना योजना क्र.३ अंतिम भूखंड क्र.९२ बुरूडगांव रोड या महानगरपालिकेच्या जागेत खाजगी खाजगी विकासकामार्फत भाजी मार्केट व व्यापारी संकुल यासाठी ई - निविदा क्र.२२५ मधील प्राप्त ४ निविदांचा व्यापारी लिफाफा दरपत्रकबाबत

नगररचना योजना क्र.३ अंतिम भूखंड क्र.९२ बुरूडगांव रोड या महानगरपालिकेच्या जागेत खाजगी विकासकामार्फत भाजी मार्केट व व्यापारी संकुल यासाठी ई - निविदा क्र. २२५ अन्वये निविदा मागविण्यांत आलेल्या होत्या. निविदाच्या कालावधीप्रमाणे ई - निविदा क्र.२२५ च्या प्राप्त निविदांची दिनांक ०५/०५/२०१२ रोजी व्यापारी लिफाफा उघडण्याची कार्यवाही मा.सभापती छाननी समिती तथा उपायुक्त (सा.) , मा. उपसभापती उपायुक्त (कर) तसेच पुढील सदस्य मा.मुख्यलेखापरिक्षक तथा मुख्यलेखाधिकारी विभाग प्रमुख मा. नगररचनाकार , शाखा अभियंता, नगररचना विभाग यांचे उपस्थितीत झाली. यामध्ये निविदा क्र.२२५ मध्ये ४ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यांची नावे पुढील प्रमाणे १] भारत उद्योग लि.नवी मुंबई २] ईगल इन्फ्रा इंडिया लि. उल्हासनगर,ठाणे ३] इंदरदिप कंन्स्ट्र. कंपनी, उल्हासनगर,ठाणे ४] प्रकाश कौंन्ट्रोवेल, लि. नाशिक उपरोक्त व्यापारी लिफाफा मा.उपायुक्त (सा.) यांचे समोर संबंधीत ठेकेदार ईगल इन्फ्रा इंडीया लि. उल्हासनगर ,ठाणे , इंदरदिप कंन्स्ट्र. कंपनी उल्हासनगर ,ठाणे , मा.नगररचनाकार , मा.मुख्यलेखाधिकारी व शहर अभियंता यांचे उपस्थितीत दिनांक ०५/०५/२०१२ रोजी उघडण्यात आले असता खालीलप्रमाणे दरपत्रक प्राप्त झाले.

| अ. क्र. | निविदा धारकांचे नांव | भारत उद्योग लि.नवी मुंबई | ईगल इन्फ्रा इंडीया लि. उल्हासनगर , जिल्हा ठाणे | प्रकाश कौन्टोवेल लि. नाशिक | इंदरदिप कंन्स्ट्र. कंपनी उल्हासनगर जिल्हा ठाणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | AMMOUNT OF PREMIUNT QUOTED IN THE TECHNICAL DOC. | 349.00 LAKHS | 367.00 LAKHS | 345.00 LAKHS | 352.00 LAKHS |

निविदा अटी शर्तीनुसार (अट क्र.३,८,१) सर्व निविदा धारकांनी प्रिमियम रक्कम रूपये ३४३.५२ लक्ष पेक्षा जास्त अदा करणे अपेक्षित होते. त्यानुसार सर्व निविदाधारकांनी प्रिमियम रक्कम रूपये ३४३.५२ लक्ष पेक्षा जास्त अदा करण्याची तयारी दर्शविलेली आहे. परंतु सर्व चारही निविदाधारकांमध्ये ईगल इन्फ्रा इंडीया लि. उल्हासनगर , जिल्हा ठाणे यांनी रूपये ३६७.०० लक्ष इतकी जास्त प्रिमियम रक्कम अदा करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

त्यानुसार मा.छाननी समितीच्या शिफारशीनुसार उपरोक्त नमुद ई- निविदा क्र.२२५ मधील एकुण चार निविदांचा अहवाल मा.स्थायी समिती अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे मंजुरीसाठी सादर करीत आहे. **/अ**

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा.):- Put up Through Aouditor & Cafo

मा.मुख्यलेखाधिकारी :- "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर

मा.उपायुक्त (सा) :- प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- "अ" मान्य दि.१७/५/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असतां त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नगररचना योजना क्रमांक-३ अंतीम भूखंड क्र.९२ बुरूडगांव रोड या महानगरपालिकेच्या जागेत खाजगी विकासकामार्फत भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसित करणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- नगररचना योजना क्रमांक ३ अंतिम भुखंड क्रमांक ९२ बुरुडगांव भागात महानगरपालिका मालकीचे ५० गुंठे जागा आहे. सदरची जागा खाजगी विकासका मार्फत भाजी मार्केट, व्यायामशाळा व व्यापारी संकुल उभारुन विकसित करावयाची आहे. सदर ठिकाणी बांधावयाच्या व्यायामशाळेसाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणेकामी रक्कम रु.५०.०० लाख सदर विकासकाने द्यावयाचे आहेत. या व्यतिरिक्त ३.६३ कोटी प्रिमियम द्यावयाचा आहे. सदर ठिकाणी भाजी मार्केट ओटे व्यायामशाळा व पार्किंगची व्यवस्था करुन देणे आवश्यक आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- सदर ठिकाणी किती गाळे बांधणार आहेत. त्याठिकाणी यापुर्वी दिलेल्या ओटे धारकांना त्याठिकाणी नव्याने जागा देणार आहात काय ?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ:- यापुर्वी सदर ठिकाणी ज्या लोकांना जागा दिलेली होती त्यांना नव्याने पुन्हा जागा देणार आहोत.भाजी ओटयाचे भाडे कराराबाबत मार्केट विभागाकडुन पुढील सविस्तर कार्यवाही होईल. सदर ठिकाणी भाजी मार्केट बांधणे कंम्पलसरी आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- सदर ठिकाणी तयार होणा-या गाळयांची विक्री कशा पध्दतीने करणार त्याचे भाडे काय असणार ?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ:- १ रुपया स्क्वेअर फुटाप्रमाणे ९९ वर्षाच्या कराराने देणार आहोत.

मा.श्री.जगताप नि.वि.:- सदर ठिकाणी बांधावयाचे व्यायामशाळेसाठी कामाची मुदत ठरवुन दिलेली आहे काय?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ:- भाजी मार्केट व्यापारी संकुल व व्यायाम शाळा बांधकामा करीता १८ महिने मुदत दिलेली आहे. सर्व इमारत बांधकाम या कालावधीत पुर्ण होणे अपेक्षित आहे. व्यायाम शाळेकरीता अद्यावत व्यायाम साहित्य खरेदी कामी ५०.०० लाख विकासकाने द्यावयाचे आहेत.

मा.श्री.जगताप नि.वि.:- सदर बांधकाम ठरवुन दिलेल्या १८ महिन्यांच्या कालावधीत पुर्ण झाले नाही तर दंडाची तरतुद केलेली आहे काय ?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- सदर ठिकाणी स्वतः विकासक हा आपले स्वतःचे पैशांची गुतवणुक करुन बांधकाम करणार असल्याने तो लवकरात लवकर बांधकाम पुर्ण करील.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- सदर ठिकाणी विकासकाला किती जागा मिळेल.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- सदरच्या जागेत महानगरपालिकेने ठरवुन दिल्याप्रमाणे शॉपिंग सेंटर , व्यायाम शाळा व भाजी विक्रेत्या साठी ओटे बांधणे व पार्किंगची व्यवस्था करणे या व्यतिरिक्त जी जागा विकासक शिल्लक ठेवेल ती जागा मिळेल.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- सदर ठिकाणी करावयाच्या भाजी मार्केट, व्यापारी संकुल व व्यायाम शाळेचा प्लॅन दाखविणेत यावा.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- व्यायाम शाळेसाठी साहित्य कशा पध्दतीने खरेदी करणार?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ:- सदर साहित्य खरेदी बाबत सविस्तर प्रस्ताव ठेवुन मंजूरी घेवून विहित पध्दतीने स्टोअर विभागामार्फत खरेदी करण्यांत येईल.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- सदर जागेपासुन मिळणारा प्रिमियम चालू वर्षातील अर्थसंकल्पामध्ये धरण्यांत आलेला आहे काय. सदर ठिकाणी जागा ९९ वर्षाच्या कराराने देणार. सदरची मुदत संपल्यानंतर पुढे काय ?

नगररचनाकार श्री.धोंगडे:- ९९ वर्षाचा करार संपल्यानंतर दुकानदारांनी जागा खाली करुन देणे आवश्यक आहे.

मा.श्री. कावरे द.ह.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिका नगररचना योजना क्रमांक-३ अंतीम भूखंड क्र.९२ बुरूडगांव रोड या महानगरपालिकेच्या जागेत खाजगी विकासकामार्फत भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसित करणेबाबत ई- निविदा क्र.२२५ नुसार मागविणेत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता त्यावरील ऑफिस रिपोर्ट पहाता अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेली किमान देकार रकमेपेक्षा जादा व मा.छाननी समितीच्या शिफारशी नुसार तुलनात्मक दृष्टया जास्तीचे निविदा धारक ईगल इन्फ्रा इंडीया लि. उल्हासनगर, जिल्हा ठाणे यांची रक्कम रूपये ३६७.०० लक्ष (रूपये तीनशे सदुसष्ट लक्ष फक्त) इतक्या देकार प्रिमियम रकमेची निविदा ही सर्वात जास्त असल्याने सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ सही /-

अनुमोदक :-मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२७ बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२७ बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लँब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना जा.क्र. १५१ दि.१९/५/२०१२

प्रस्तावना-विषय- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लँब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

सादर,

रक्तपेढी विभाग जा.क्र. ७ दिनांक ३०/४/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर श्रीमती पल्लवी दगडू मोरे यांची सहा महिन्याकरिता आस्थापना जा.क्र. २३४१ दिनांक ११/११/२०११ पासून नेमणूक करण्यांत आलेली होती त्यानुसार त्या दिनांक १५/११/२०११ पासून ते १५/५/२०१२ या सहा महिन्याच्या कालावधी मध्ये रक्तपेढी विभागामध्ये कार्यरत होत्या. रक्तपेढी विभागासंबंधी असणारे त्यांचे काम समाधानकारक असुन पुढील कालावधीसाठी खंड देवून पुनर्नियुक्ती आदेश देण्याबाबत मंजुरीस्तव करिता नमुद करून सुचित केलेले आहे.सदर प्रस्तावावर मा.प्रभारी आरोग्याधिकारी यांनी "सदर पदावर पुढील सहा महिन्याकरिता नियमानुसार एक दिवस तांत्रिक खंड देवून पुनर्नियुक्ती देणेबाबत कार्यवाहीस्तव." असे नमुद करून अभिप्राय दिलेला आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी अत्यावश्यक सेवेकरिता श्रीमती मोरे पल्लवी दगडू यांची जा.क्र. आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणूक /७३९ दिनांक १७/५/२०१२अन्वये तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १३,०००/- (रू. तेरा हजार मात्र.) या मानधनावर दिनांक १७/५/२०१२ पासून सहा महिन्यांच्या कालावधी करिता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख /सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर कंत्राटी करारानुसार मानधनावर करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**ठरावः-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १३,०००/- (रूपये तेरा हजार मात्र.) या मानधनावर दिनांक १७/५/२०१२ पासून सहा महिन्यांच्या कालावधी करिता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक-२८ बुधवार दि.२३/५/२०१२

ठराव क्रमांक-२८ बुधवार दि.२३/५/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मा.न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात कामकाजाकरीता मागील कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांचा फेरविचार करणे व काही नव्याने नेमणुक करावयाचे बाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना वर्क जा.क्र. १५२ दि.१९/५/२०१२

विषय- मा.न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात कामकाजाकरीता मागील कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांचा फेरविचार करणे व काही नव्याने नेमणुक करावयाचे बाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव

सादर,

अहमदनगर महानगरपालिके मार्फत मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पाहणे करीता सद्यस्थितीमध्ये खालीलप्रमाणे कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) ॲडव्होकेट म्हणुन दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती असुन त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ नं. | विधी तज्ञ यांचे नांव | नियुक्ती आदेश क्र. दिनांक | कालावधी व सद्यस्थिती मधील दरमहा मानधन | कामकाजाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| १ | ॲड.श्री.एस.के. पाटील | कोर्ट विभाग जा.क्र. ४६४ दि.१३/८/०३ | दि.१३/८/२००३ पासून पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थितीमध्ये दरमहा मानधन रू.१२,०००/- | मा.औद्योगिक न्यायालय व कामगार न्यायालय |
| २ | ॲड. श्री.व्ही.एस.बेंद्रे | जा.क्र.आस्था. १३८५ दि.१/८/०९ | दि.१/८/२००९ पासुन पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थितीमध्ये दरमहा मानधन रू.१२,०००/- | मा.उच्च न्यायालय , औरंगाबाद खंडपीठ |
| ३ | ॲड.श्री.किशोर एन. लोखंडे | जा.क्र.आस्था. १३८५ दि.१/८/०९ | दि.१/८/२००९ पासुन पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थितीमध्ये दरमहा मानधन रू.१२,०००/- | मा.उच्च न्यायालय , औरंगाबाद खंडपीठ |
| ४ | ॲड. सौ. मंगला कोठारी | जा.क्र.आस्था. १३८५ दि.१/८/०९ | दि.१/८/२००९ पासुन पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थितीमध्ये दरमहा मानधन रू.१०,०००/- | मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय , अहमदनगर |
| ५ | ॲड.श्री.तुळशीराम बाबर | जा.क्र.आस्था. १३८५ दि.१/८/०९ | दि.१/८/२००९ पासुन पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थितीमध्ये दरमहा मानधन रू.१०,०००/- | मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय , अहमदनगर |

अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात मा.न्यायालयामध्ये कामकाज पहात असलेले वरील तक्त्यांमधील अनुक्रमांक २ ते ५कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांची मानधनावरील पुढील आदेश होईपर्यतच्या नियुक्त्या ह्या मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३९ दिनांक ३१/७/२००९ च्या ठरावाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या आहेत.

मा.सौ. शिला अनिल शिंदे, महापौर यांनी जा.क्र. १०४३ दिनांक ४/१/२०१२ अन्वये पत्र देवुन त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या काही मानद विधी तज्ञांची फेररचना करणे आवश्यक आहे. मा. टॅक्स अपिल तसेच इतर ही मा.न्यायालयातील दाव्यांना गती मिळणे क्रमप्राप्त आहे. कारण बरीच दाव्याचे प्रकरणे अनेक वर्षापासून प्रंलबित असल्याचे दिसुन येत आहे.मा.अॅड. मंगेश व्ही.दिवाणे, १५७,चौपाटी कारंजा, अहमदनगर तसेच मा.अॅड.शशिकांत बापुराव रकटे, जाधवमळा, कायनेटीक इंजिनियरींग मागे, बुरूडगांव, अहमदनगर यांनी इकडेस मानद सल्लागार तज्ञ पदी नेमणूक मिळणेबाबत अर्जाद्वारे विनंती केली आहे. अर्जदार यांचे अर्जावर प्रस्ताव ठेवणेबाबत" नमुद करून सुचित केलेले आहे.

उपरोक्त प्रकरणी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांतआलेला होता.मा.सभापती ,स्थायी समिती त्यांच्याकडील दिनांक २६/४/२०१२ च्या पत्रान्वये मा. अॅडव्होकेट श्री. प्रतिक प्रकाश कोठारी यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथील पॅनलवर मा.उच्च न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात विधीतज्ञ म्हणुन कामकाज पाहणे संदर्भात अर्ज दिलेला आहे. त्यांनी केलेल्या अर्जानुसार एकत्रित प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे पाठविणे बाबत सुचित केलेले आहे.

अॅड.श्री. प्रतिक प्रकाश कोठारी, औरंगाबाद यांनी दिनांक १८/४/२०१२ रोजी अर्जामध्ये नमुद करून इकडेस अर्ज सादर केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.न्यायालयामधील दाव्या संदर्भात कामकाज पाहणे करीता मागील कायेदशीर सल्लागार (विधी तज्ञ) अॅडव्होकेट यांचा फेरविचार करून काही नव्याने कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) म्हणून अॅडव्होकेट यांच्या दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्त्या करावयाच्या बाबत निर्णय झाल्यास त्या करीता वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने जाहिरात प्रसिध्दी करीता मा.कामगार अधिकारी यांचे दिनांक २८/१२/२०११ च्या अहवालाच्या अनुषंगाने पदनाम, पदसंख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, दरमहा मानधन इ. खालील प्रमाणे ठरवावे लागेल.

| अ नं. | पदनाम | पद संख्या | कामकाजाचे स्वरूप | आवश्यक शैक्षणिक अर्हता | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | विधी तज्ञ (कायदेशीर सल्लागार) | २ | मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे विधी तज्ञ (अॅडव्होकेट) म्हणुन तद्नुषंगीक सर्व कामकाज पहाणे. | कायदा पदवीधारक व विधी तज्ञ (अॅडव्होकेट) म्हणुन मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे सर्व कामकाजाचा अनुभव आवश्यक | १२,०००/- |
| २ | विधी तज्ञ (कायदेशीर सल्लागार) | २ | मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय येथे विधी तज्ञ (अॅडव्होकेट) म्हणुन तद्नुषंगीक सर्व कामकाज पहाणे. | कायदा पदवीधारक व विधी तज्ञ (अॅडव्होकेट) म्हणुन मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय येथे सर्व कामकाजाचा अनुभव आवश्यक | १०,०००/- |
| ३ | विधी तज्ञ (कायदेशीर सल्लागार) | १ | मा.औद्योगिक न्यायालय व कामगार न्यायालय येथे विधी तज्ञ (अॅडव्होकेट) म्हणुन तद्नुषंगीक सर्व कामकाज पहाणे. | कायदा पदवीधारक व विधी तज्ञ (अॅडव्होकेट) म्हणुन औद्योगिक न्यायालय व कामगार न्यायालय येथे सर्व कामकाजाचा अनुभव आवश्यक | १२,०००/- |

तरी मा.न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात कामकाजाकरीता मागील कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांचा फेरविचार करून काही नव्याने कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) म्हणून ॲडव्होकेट यांच्या दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्त्या करावयाच्या बाबत निर्णय झाल्यास या बाबत सदरचा प्रस्ताव निर्णया करीता मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख /सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-मा.न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात कामकाजा करीता मागील कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांचा फेरविचार करणे व काही नव्याने नेमणुक करावयाचे बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

आस्थापना प्रमुख श्री.सोनवणे :- अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात कामकाजा करीता खालील प्रमाणे वकीलांची नेमणुक करणेत आली आहे. ॲड.श्री.एस.के.पाटील दिनांक १३/०८/२००३ पासुन दरमहा मानधन रु.१२,०००/- मध्ये मा.औद्योगि न्यायालय व मा.कामगार न्यायालय येथे काम पहातात. ॲड.श्री.व्ही.एस.बेद्रे दिनांक ०१/०८/२००९ पासुन दरमहा मानधन रु.१२,०००/- मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे कामकाज पहातात. ॲड.श्री.किशोर लोखंडे दिनांक ०१/०८/२००९ पासुन मानधन रु. १२,०००/- वर मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे कामकाज पहातात. ॲड.सौ.मंगला कोठारी दिनांक ०१/०८/२००९ पासुन मानधन रु.१०,०००/- मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय, अहमदनगर येथे कामकाज पहातात. ॲड.श्री.तुळशीराम बाबर दिनांक ०१/०८/२००९ पासुन मानधन रु.१०,०००/- मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय, अहमदनगर येथे कामकाज पहातात.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- विविध न्यायालयांमध्ये महानगरपालिकेच्या किती केसेस प्रलंबित आहेत.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- वकीलांचे पॅनल नविन नेमणुकी बाबत महानगरपालिकेची मागणी आहे काय ? वकील नेमणुकी बाबत जाहीरात प्रसिध्द केली आहे काय ?

मा.श्री.भोसले ग.पुं. :- नविन वकील नेमणुकी बाबत प्रस्ताव कोणाचा आहे. ?

आस्थापना प्रमुख श्री.सोनवणे :- ॲड.श्री.शशिकांत रकटे, ॲड.श्री.मंगेश दिवाणे व ॲड.श्री. प्रतिक कोठारी यांनी केलेल्या अर्जानुसार प्रस्ताव ठेवणेत आलेला आहे. तसेच ॲडव्होकेट पॅनल फेरबदल व नवीन नेमणूकाबाबत प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत. मा.महापौर सा़ो, मा.सभापती स्थायी समिती यांनी दिलेल्या पत्रानुसार कार्यवाही केली आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:-सद्यस्थिती नियुक्तीवर असलेले वकीलांचे पॅनल बदलणेबाबत महानगरपालिका प्रशासनाचे मत काय आहे? वर्तमान पत्रात जाहीरात दिल्यानंतर वकील नेमणुक करणे बाबत अर्ज आल्यानंतर त्यांची नियुक्ती महानगरपालिका करणार काय ?

मा.उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे साहेब :- सन २००३ व २००९ मध्ये वकील पॅनल नेमलेले आहेत.

आस्थापना श्री.सोनवणे :- सन २००३ मध्ये कामगार विभागाकडुन महानगरपालिकेच्या पॅनलवर वकील नेमणुक करण्यांत आलेली होती. तसेच सन २००९ पासून ठरावानुसार नियुक्ती करण्यांत आलेल्या आहेत.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- सन २००९ मध्ये वकील नेमणुकी बाबत जाहीरात दिली होती काय ? तेंव्हा जाहीरात न देता वकील नेमणुक केली मग आता जाहीरात कशासाठी द्यावयाची

मा.उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे साहेब :- कागदपत्रांचे अवलोकन करता सन २००९ मध्ये वकील नेमणुकी करीता जाहीरात दिलेली नव्हती परंतु ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी साठी कुठल्याही प्रकारची जागा भरावयाची असल्यास त्या करीता वर्तमान पत्रामध्ये जाहीरात देवुन अर्ज मागवुन अर्जांची छानना करुन विहित मार्गाने आवश्यक त्या उमेदवारांची निवड करुन अंतिम मंजूरीकरीता विषय मा.स्थायी समितीपुढे ठेवणे अशी कार्यवाही होणे अपेक्षित आहे. आजच्या बैठकीत नेमणुक करावयाच्या वकीलांची संख्या व त्यांचे मानधन ठरविणे आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- सन २००९ मध्ये वकील नेमणुकी करीता एक निर्णय आणि सन २०१२ मध्ये वेगळा निर्णय का घेता ? आजचा ठराव सन २००९ प्रमाणे करण्यांत यावा.

मा.श्री.लोंढे सु.सो. :- सन २००९ मध्ये वकील नेमणुकी करीता करण्यांत आलेला ठराव कायदेशीर होता काय ? जर तो कायदेशिर नसेल तर आजपर्यंत त्या नेमणुक केलेल्या वकीलांनी केलेले कामकाज बेकायदेशिर होते काय ? त्यांना आजपर्यंत देण्यांत आलेले मानधन त्यांचेकडुन वसुल करणार काय ? महानगरपालिकेच्या किती केसेस पेंडींग आहेत.

मा.श्री.डागवाले कि.आ.:-महानगरपालिकेच्या पॅनलवर वकील नेमणुक केल्यानंतर त्यांना महानगर पालिके मार्फत मोबाईल देणे योग्य आहे काय त्याचे बील महानगरपालिका भरते काय ?

मुख्यलेखाधिकारी श्री.प्रदीप शेलारः- मोबाईलचे दरमहा येणारे बिल त्यांच्या मानधनातुन कपात करण्यांत येते.

मा.श्री. कोतकर सु.स. :- आजपर्यंत महानगरपालिकेच्या वतीने किती केसेस दाखल झाल्या किती निकाली निघाल्या व किती प्रलंबित आहेत.

कोर्ट क्लार्क श्री.गणेश रायपेल्ली :- मा.जिल्हा न्यायालयात १३७३ केसेस आहेत. पैकी ॲड.श्री.टी.ई. बाबर यांचेकडेस ४५४, ॲड.सौ.मंगला कोठारी यांचेकडेस ९१९ अर्ज आहेत. मागील चार महिन्यात ४१२ अर्ज निकाली निघालेले आहेत. महानगरपालिकेच्या बाजुने २१५ केसेसचा निकाल लागलेला असुन १९७ केसेस महानगरपालिकेच्या विरुध्द गेलेल्या आहेत. मा.उच्च न्यायालय, मुंबई चे औरंगाबाद खंडपीठात १३७ केसेस दाखल असुन मागील चार महिन्यात दोन केसेस निकाली निघालेल्या असुन त्यापैकी एक केसचा मनपाच्या विरुध्द निकाल लागलेला आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- पेंडीग केसेसची संख्या पहाता यामध्ये जिल्हा न्यायालयाकरीता पुर्वीचे वकीलांचे ऐवजी ३ नवीन वकीलांची नेमणूक करण्यात यावी. तसेच उच्च न्यायालयात देखील पुर्वीचे वकील कायम ठेउन १ नवीन वकीलांची नेमणूका करण्यांत यावी.

मा.श्री. कावरे द.ह.:- मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अ.नगर येथील दोन वकील कमी करणेत येवून अर्जदार ॲड.श्री.शशिकांत रकटे,ॲड.श्री.मंगेश दिवाणे यांची पुर्वीच्या दरमहा मानधनावर नियुक्ती करण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- जिल्हा न्यायालयातील २ वकीलांना कार्यामुक्त करण्यात यावे. व जिल्हा न्यायालयासाठी (१) ॲड.श्री. शशिकांत बापुराव रकटे (२) ॲड. श्री. मंगेश वसंतराव दिवाणे यांची दरमहा रूपये १०,०००/- प्रत्येकीचे मानधनावर नेमणूक करण्यास मंजूरी देण्यांत यावी. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयातील औरंगाबाद खंडपीठात पुर्वीच्या विधी तज्ञांबरोबरच ॲड. श्री. प्रतिक प्रकाश कोठारी यांची दरमहा रूपये १२,०००/- चे मानधनावर नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-अहमदनगर महानगरपालिकेचे विधीतज्ञांचे पॅनलशिपवरील जिल्हा न्यायालयातील कामकाज पहाणारे पुर्वीचे विधीतज्ञ ॲड.श्री टी.ए.बाबर व ॲड.सौ. मंगला कोठारी यांना कार्यमुक्त करण्यात यावे. त्यांचेकडील महत्वाचे दस्तऐवज कागदपत्रे ताब्यात घेण्यात यावी. व अर्जदार ॲड. श्री. शशिकांत बापुराव रकटे व ॲड. श्री. मंगेश वसंतराव दिवाणे यांची दरमहा रूपये१०,०००/- प्रत्येकीचे मानधनावर नेमणूक करण्यात यावी. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठातील पुर्वीच्या विधीतज्ञ बरोबराच ॲड.श्री. प्रातिक प्रकाश कोठारी यांची दरमहा रूपये १२,०००/- चे मानधनावर सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**<u>ठराव</u> :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मा.न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात कामकाजाकरीता मागील कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांचा फेरविचार करणे व काही नव्याने नेमणुक करावयाचे बाबतचा प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार पुढील प्रमाणे निणर्य घेण्यात येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे विधीतज्ञांचे पॅनलशीवर पुर्वी कार्यरत असलेल्या विधीतज्ञांपैकी ॲड.श्री. टी.ई. बाबर व ॲड.सौ. मंगला राजेश कोठारी दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर यांना कार्यमुक्त करण्यात यावे त्यांचेकडील असलेले कागदपत्रे व इतर तद्नुंषगिक दस्तऐवज ऑफिस प्रकरणे प्रभारी कामगार अधिकारी,अहमदनगर महानगर पालिका यांनी ताब्यात घेउन सदर कागदपत्रे नव्याने मानद नियुक्त करण्यात आलेल्या विधी तज्ञांना देणेबाबत कार्यवाही करावी. ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद अर्जदार ॲड.श्री. शशिकांत बापुराव रकटे व ॲड.श्री. मंगेश वसंतराव दिवाणे (दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर) यांना दरमहा रूपये १०,०००/-(रूपये दहा हजार फक्त) मानधनावर

तसेच मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथील कामकाजाचे स्वरूप पहाता व कामाचा निपटारा होणेकामी पुर्वीच्या विधीतज्ञासह ॲड.श्री. प्रतिक प्रकाश कोठारी यांची रूपये १२,०००/-(रूपये बारा हजार फक्त) दरमहा या मानधनावर पुढील आदेश होईपावेतो नेमणुक करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

मा.स्थायी समितीने यापुर्वी विधीतज्ञांचे केलेल्या नेमणूकीची प्रक्रिये नुसार कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका